महाराष्ट्र शासन

**कार्यालय-राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प,(अवर्षण प्रवण उपकेंद्र),वनशेती**

**कृषि विद्या विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.**

दूरध्वनी क्र/माक - ०२४२६ - २४३२३९
ई - मेल: narpagfmpkv@gmail.com

पत्ता : मध्यवर्ती परिसर, पदव्युत्तर महाविद्यालय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

जा.क्र./प्र.कृ.विद्या/रा.कृ.सं.प्र/ बांबु दरपत्रके/१४१/२०२५ दिनांक - ०४/ १२ /२०२५

**प्रति,**

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

**विषय :-** राष्ट्रीय कृषि संशोधन प्रकल्प, अवर्षण प्रवण उपकेंद्र (वनशेती), कृषिविद्या विभाग, म.फु.कृ.वि.,राहुरी प्रकल्पाचे प्रक्षेत्रावरील परिपक्व बांबु वजनावर प्रती टन दराने खरेदीचे दरपत्रकाबाबत...

वरील विषयानुसार राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, अवर्षण प्रवण उपकेंद्र (वनशेती), कृषिविद्या विभाग, म.फु.कृ.वि., राहुरी प्रकल्पाचे प्रक्षेत्रावरील परिपक्व बांबु खालील तपशिलानुसार विक्री करणे आवश्यक आहे.

| **अ.नं.** | **कामाचा तपशिल** | **दर (प्रति टन)** |
|---|---|---|
| १. | बांबु रांजीमधील / बेटातील परिपक्व बांबुची तोडणी करुन वजनावर प्रती टन खरेदीसाठीचे दर | |

तरी आपली दरपत्रके सिलबंद पाकिटामध्ये मा. प्रमुख, कृषिविद्या विभाग, राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प, अवर्षण प्रवण उपकेंद्र (वनशेती), मफुकृवि, राहुरी यांचे नावे या कार्यालयांत दि. १९ /१२ /२०२५ अखेर ५.०० वाजेपर्यंत पोस्टाने पोहोचतील अशा बेताने पाठवावीत. तसेच बंद पाकिटावर ' **बांबु खरेदी करावयाच्या विविध कामाचे सर्वसमावेषक दरपत्रक**' असा स्पष्ट उलेख असावा.

**अटी व शर्ती :-**

१. ज्या कोणाला दरपत्रक भरण्यास भाग घ्यावयाचा असल्यास ओळख पटविणारे मतदार ओळखपत्र/ आधारकार्ड/ पॅनकार्ड या पैकी एकाची छायांकीत प्रत सादर करणे बंधनकारक राहील. **बांबुची तोडणी करून विक्री करणे** करीता रु. **५०,०००/- (अक्षरी रु. पन्नास हजार मात्र)** सदर कामासाठी भरावयाच्या सुरक्षा रकमेचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा स्वतंत्र धनाकर्ष (डिमांड ड्राफट ) देणे आवश्यक राहील.
२. नियम व अटी नुसार मंजुर दरपत्रक धाराकाकडून दैनंदिन वजना प्रमाणे वजन स्लिप व दरपत्रकानुसार प्रति मे.टना प्रमाणे रक्कम भरणा करावा लागेल व त्यानंतरच गेट पास दिला जाईल.
३. सदरील बांबुची तोडणी कालावधी दरपत्रक उघडल्यापासुन ६ महिने एवढा राहील. सदरील बांबुची तोडणी कामासाठी मुदतवाढ मिळणार नाही.
४. सदर परिपक्व बांबुची तोडणी स्वखर्चाने करावी लागेल. याकरिता कुठलेही वाहनभाडे तसेच भराई / उतराई भाडे विद्यापीठाकडुन दिले जाणार नाही. हा खर्च दरपत्रकधारकाने करावयाचा आहे.
५. दरपत्रक धारकाकडुन बांबुची तोडणी करताना प्रक्षेत्रावरील कोणत्याही पिकाचे अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्यास संबंधित दरपत्रक धाराकाकडून नुकसान भरपाई घेण्यात येईल.

६. दरपत्रक स्विकृती दिल्यानंतर बांबुची तोडणी, राखण इत्यादी सर्व जबाबदारी ही दरपत्रक धारकांची राहील. प्रक्षेत्रावर विजेचा अनधिकृत वापर कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही.

७. दरपत्रक स्विकारणे हे मा. संशोधन संचालक तथा अध्यक्ष निविदा समिती यांचे अखत्यारित राहील. तसेच या बांबुची तोडणी व विक्री दरपत्रक बाबतचे सर्व अधिकार खाली सही करणाराने राखून ठेवले आहेत. तसेच दरपत्रक उघडलेनंतर अपेक्षित रक्कम न आल्यास दरपत्रक मंजूर करण्याचे अथवा संपूर्ण दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार मा.संशोधन संचालक तथा अध्यक्ष दरपत्रक समिती यांना राहतील.

८. दरपत्रक स्विकृतीनंतर नैसर्गिक आपत्तीने व इतर काही कारणाने नुकसान झाल्यास कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही किंवा त्याबाबत वेगळी सवलत मागता येणार नाही. तसा कोणताही अधिकार दरपत्रक धारकास असणार नाही.

**९. दरपत्रक अटी व शर्तीचा भंग झाल्यास अनामत रक्कम व त्यानंतर इतर भरलेली रक्कम ही कायम स्वरूपी जप्त करण्यात येऊन दरपत्रकधारकाच्या उर्वरीत रकमेसाठी विद्यापीठातर्फे कायदेशीर कार्यवाही केली जाईल.**

१०. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर बांबुची तोडणी व विक्रीबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल विद्यापीठाकडून स्विकारली जाणार नाही. बांबु खरेदीची पूर्ण जबाबदारी ही सर्वस्वी दरपत्रक धारकावर राहील याची नोंद घ्यावी.

११. बांबुची तोडणी करतांना दरपत्रक धारकाच्या कामगारांच्या अपघात व जिविताची जबाबदारी दरपत्रक धारकाची राहील.

१२. दरपत्रक स्विकृती नंतर, दरपत्रक धारकास जे कामगार बांबुची तोडणी कामासाठी ठेवावयाचे आहेत, त्यांचा कामगार नुकसान भरपाई कायद्यानुसार भरपाई द्यावयाच्या बाबतचा विमा हा परस्पर उतरविणे बंधनकारक राहील. संबंधीत कामगारांना काही नुकसान भरपाई देय झाल्यास ती पुर्णपणे दरपत्रकधारकाने द्यावयाची आहे. याबाबत कृषि विद्यापीठास कोणत्याही प्रकारे तोशिष लागू राहणार नाही. तसेच याबाबत काही आकस्मित आर्थिक नुकसान झाल्यास विद्यापीठ दरपत्रक धारकाकडून सदरील आर्थिक नुकसान वसुल केली जाईल.

१३. दरपत्रकधारक व त्यांनी नेमलेल्या मजुरांनाच फक्त प्रक्षेत्रावर प्रवेश मिळेल. इतर व्यक्तींना प्रक्षेत्रावर प्रवेश दिला जाणार नाही. दरपत्रकधारकाशिवाय इतर व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. तसेच दरपत्रकधारक त्याचा ठेका दुस-याला परस्पर देऊ शकणार नाही, असे आढळल्यास जमा केलेली अनामत रक्कम जप्त केली जाईल व त्याचा ठेका रद्द केला जाईल.

१४. कोणताही दरपत्रकधारक बालमजूर ठेवू शकणार नाही, असे आढळल्यास त्यांचेविरुध्द फौजदारी तक्रार दाखल केली जाईल.

१५. दरपत्रकधारक धारकास फक्त प्रक्षेत्रावरील तोडणी योग्य बांबुची तोडणी करुन खरेदी करण्याची मुदत दरपत्रक उघडल्याच्या दिनांकापासुन ६ महीने राहील.

१६. प्लॉटमधील छाटणी केलेल्या बांबुच्या फांद्या व काडीकचरा बांधावर गोळा करुन टाकणे बंधनकारक राहील.

१७. ३० मि.मी. व्यासापेक्षा जास्त व्यासाचे सर्व बांबु काठी खरेदी करणे बंधनकारक राहील.

१८. कार्यालयाने नेमुण दिलेल्या प्लॉट मधीलच बांबु काढणे बंधनकारक राहील.

१९. दरपत्रक मंजुरीनंतर ८ दिवसाच्या आत बांबु तोडणीचे काम सुरु करणे आवश्यक राहील.

२०. प्रायोगिक बांबु पिकातील बांबु तोडणी कार्यालयाच्या सुचनेप्रमाणे करावी लागेल.

**प्रमुख**
**कृषि विद्या विभाग**
**म.फु.कृ.वि,राहुरी**